ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

भारतीय आदिवासी
लोकधारा विशेषांक

# तिफण

वर्ष : १५ वे । अंक : दुसरा
एप्रिल ते जून : २०२४



| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | पश्चिम खानदेशातील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत कॉम्रेड कांतीलाल रावजी वसावे आणि जयंतराव गणपतराव नाटक यांचे योगदान | डॉ. सुनिल छोटू पवार | २२९ |
| ३९ | आदिवासी बहुल हॉलीबॉल खेळाडुंच्या कारक क्षमता व शरीरमिती घटनांचे तुलनात्मक अध्ययन | आकाश दिपक बिवाल | २३३ |
| ४० | शेतकरी आणि आदिवासी चळवळ | डॉ. बालाजी विठ्ठलराव पवार | २३७ |
| ४१ | पंचायत विस्तार अधिनियम १९६६ (पेसा) चा आदिवासी समजावरील झालेल्या परिणामांचे समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. सागर बडगे | २४५ |
| ४२ | नंदुरबार जिल्ह्यातील महाविद्यालयीन ग्रंथालयाचा वित्तीय व्यवस्थापनाचा अभ्यास | अजित हिरकणे<br>डॉ.दिनेश विक्रम पाटील | २५४ |
| ४३ | कृषी संकटे आणि शेतकरी आत्महत्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.प्रियंका राजेंद्र आठे | २५८ |
| ४४ | पश्चिम खान्देशातील आदिवासी संस्कृती | डॉ. शरद बाबुराव सोनवणे | २६५ |
| ४५ | चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगीकरणाचा नागरी समाजाच्या आरोग्यावर होणारा परिणाम | डॉ. विनायक शिंदे<br>सतीश गोवर्धन पेटकर | २७३ |
| ४६ | भिल्लांचे आध्यात्मिक गुरु : संत आपश्री गुला महाराज | प्रा. उषा ठोबा पावरा<br>प्रा. डॉ. राजेंद्र गुलाबराव काकुस्ते | २८० |

# कृषी संकटे आणि शेतकरी आत्महत्या एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. प्रियंका राजेंद्र आठे**


**सारांश**

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. शेती हा भारताचा मुख्य व्यवसाय आहे. आजही ७५ टक्के लोक शेती हा मुख्य व्यवसाय करतात. बिनाभरवश्याचा व्यवसाय म्हणजे शेती बनतो आहे. देशातील शेती आणि शेतकरी आज संकटात आहे. जगाच्या पोशिंद्याला स्वस्त धान्याच्या दुकानवर रांगेत उभा राहून 'अन्न सुरक्षा योजना' धान्य घ्यावे लागते. ही बाब अत्यंत गभीर, चिंता आणि चिंतन करायला लावणारी आहे. दर तासाला किमान दोन शेतकरी आत्महत्या करतात. या आत्महत्येची मुळे १९९१ च्या नव आर्थिक धोरणात असल्याचे दिसून येते. आजपर्यंत देशात सात लाखापेक्षा अधिक शेत-यांनी आत्महत्या केल्या आहेत. दरवर्षी सरासरी १४ ते १५ हजार शेतकरी आत्महत्या करतात. म्हणजे दिवसाला या देशात ४० आत्महत्या होतात, असे नॅशनल सॅम्पर स्व्हेंं ऑर्गनायझेशनद्वारे सरकारने प्रसिद्ध केलेल्या या आकडेवारीवर जरी विश्वास ठेवला तरी दर तासाला दोन शेतकरी आत्महत्या करतात. हे सिद्ध होते. शेतक-यांच्या आत्महत्या ही एक राष्ट्रीय आपत्ती आहे, तरी देशातील शासन आणि प्रशासन गंभीरपणे या समस्याकडे पाहतांना दिसत नाहीत. प्रचार आणि प्रसारमाध्यमे पाहिजे त्याप्रमाणात प्रबोधन करत नाहीत किंवा चर्चा घडवून आणत नाहीत. व्यवस्थेमध्ये गांभीर्य निर्माण करत नाही. एकूण शेती आणि शेत-यांच्या प्रश्नाकडे शासन आणि प्रशासनाची बेफिकीरवृत्ती आणि उदासीन मानसिकता तपासणे आवश्यक झाले आहे. तसेच शेतक-यांच्या नैराश्य,कृषी संकटे आणि वैफल्येग्रस्ततेचे मुळ कारणे शोधनेही काळाची गरज आहे. त्यातूनच आपण जगाच्या पोशिंदा बळीराजा वाचवू शकतो. प्रस्तुत शोध निबंधात या सर्व बाबींची चर्चा केली आहे.



**कीवर्ड**

शेती, कृषी संकटे कारणे,शेतकरी आत्महत्या, कारणे, उपाययोजना.


**प्रास्तावना**

कृषी व्यवसाय हा जगातील अत्यंत प्राचीन व्यवसाय असून आधुनिक काळातही तो व्यापक प्रमाणात केला जातो. जगातील जवळ-जवळ दोन तृतीयांश लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. कृषिक्षेत्र सर्व विकासाची जननी आहे. जगातील विकसीत राष्ट्रांनी अगोदर उपलब्ध संसाधनाचा सुयोग्य वापर करुन कृषि उत्पादनात संख्यात्मक व त्यानंतर गुणात्मक सुधारणा केली आणि पुढे कालांतराने प्रगत व व्यापारी शेतीचा विकास करण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. इंग्लंडचा इतिहास स्पष्ट दर्शवितो की, तेथे कृषि क्रांतीमुळे औद्योगिक क्रांती झाली. अमेरिका आणि जपानमध्ये सुध्दा कृषि विकासामुळे औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात विस्तार होण्यास मदत झाली. जगातील विकसीत देशावरुन असे लक्षात येते की, औद्योगिक आणि सेवा क्षेत्राचा विकास हा व्यापक अर्थाने शेती क्षेत्रावरच अवलंबून आहे म्हणूनच कृषिक्षेत्र मानवी जीवनाला पोषक आणि प्रगतीसाठी आवश्यक मानले गेले आहे.

विकसनशील अर्थव्यवस्थेत देखील कृषिक्षेत्र मुलभूत असते. कारण सकल राष्ट्रीय उत्पन्नात मोठा वाटा, वाढत्या लोकसंख्येला रोजगार आणि अन्नधान्याची उपलब्धता, निर्यातीमधील हिस्सा, विदेशी चलन प्राप्ती, औद्योगिक विकासासाठी कच्चा माल व श्रम पुरवठा, अंतर्गत-बाह्य व्यापार आदिंचा मुख्य आधार कृषि क्षेत्रच असते. तसेच अल्पविकसीत अर्थव्यवस्था देखील जोपर्यंत कृषि क्षेत्राकडे लक्ष देत नाहीत. तोपर्यंत त्या विकासाचा चांगला दर प्राप्त करु शकत नाहीत. कारण या अर्थव्यवस्थेत मुख्य प्रश्न भांडवलाचा अभाव हा असतो आणि कृषि क्षेत्राच्या विकासासाठी इतर क्षेत्राच्या तुलनेत कमी भांडवलाची गरज असते. विकासाच्या सुरुवातीच्या टप्यात कृषिक्षेत्राच्या विकासाला चालना देऊनच ख-या अर्थाने विकास होऊ शकतो. कृषि क्षेत्रातील उत्पादन विविधता आणि स्वरुपातील भिन्नता यामुळे कृषि एक उद्योग नसून, वास्तवात अनेक उद्योगांचा प्रमुख सूचक आहे. विकासाचा खरा प्रेरक आहे. म्हणूनच शेती हाच आर्थिक विकासासाठी मुलभूत व्यवसाय आहे.परंतु वाढत्या शेती वरील संकटांमुळे शेतकरी आत्मत्या गंभीर विषय बनला आहे.

**उद्दिष्टे**

१. कृषीक्षेत्राच्या समस्यांचा अभ्यास करणे.

२. शेतकऱ्यांच्या आत्म्हतेच्या करणाचा अभ्यास करणे.

३. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी संभाव्य उपायांची चर्चा करणे.

**अभ्यासाची गृहितके**

१. पर्जन्यमान, जलसिंचनाच्या अपूर्ण सोयी,शेती संशोधनाकडे दुर्लक्ष, जमीन कसण्याची पद्धत आदी कारणामुळे शेतीच्या समस्या वाढल्या आहेत.

२. शासन आणि प्रशासनाची उदासिनता, पर्यावरणाचा -हास, वाढती लोकसंख्या, वाढता भौतिकवाद आणि दुष्काळ आदी कारणे शेतक-यांच्या आत्महत्याला कारणीभूत आहेत.

३. लोकाभिमुख कल्याणकारी योजना राबविण्यासाठी आणि प्रशासनाची मानसिकता सकारात्मक असणे आवश्यक आहे.

**संशोधन पद्धती**

"कृषी संकटे आणि शेतकरी आत्महत्या एक समाजशास्त्रीय अभ्यास" या शोधनिबंधाच्या मांडणीसाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे आणि प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन केले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून काही सामग्री संकलित केली आहे.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्या**

"जेव्हा एखादी कमकुवत मनाची व्यक्ती आर्थिक, सामाजिक आणि राजकीय कारणातून निर्माण झालेल्या नैराश्यातून अकाली आपली जीवन यात्रा संपवतो तेव्हा त्याला आत्महत्या असे मानले जाते".

१९९५ पासून नॅशनल काईम रेकॉर्ड ब्युरो हे शेतकरी आत्महत्यांची नोंद ठेवतो याचा अर्थ असा नाही की, त्याआधी आत्महत्या होत नव्हत्या, मात्र १९९० नंतर शेतकरी आत्महत्येची वाढती संख्या आणि प्रमाण यामुळे नोंदी ठेवण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रात विदर्भ हे शेतकरी आत्महत्येचे केंद्र. मात्र मागील पाच वर्षामध्ये मराठवाडयातील शेतकऱ्यांनी देखील आत्महत्या करण्यास सुरुवात केली आहे. १९९० पर्यंत असेच काहीसे हरितक्रांतीच्या पहिल्या टप्प्यातील पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेश सारख्या प्रदेशांमध्ये शेतकरी आत्महत्येची नोंद होत होती. मात्र १९९० नंतर देशाच्या इतर भागातही आत्महत्येचे सत्र सुरु झाले. २०१४ पर्यंत देशभरात तब्बल ३ लाख २० हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी जीवन संपवल्याचे आकडेवारी सांगते. जम्मू कश्मीर आणि नॉर्थ इस्ट सोडता शेतकरी आत्महत्या झाल्या नाही असा कुठलाच भाग नाही, आधि केवळ अल्पभूधारक शेतकरी आत्महत्या करीत असल्याची परिस्थिती होती. मात्र आता सर्वच प्रकारचे लहान, मध्यम, मोठे शेतकरी आणि शेतमजूर देखील आत्महत्या करीत असल्याचे आकडेवारी सांगते.

**कृषीक्षेत्राच्या समस्या**

१) **पर्जन्यमान :** भारतात अनियमित स्वरुपाचे पर्जन्यमान आहे. पिकांची लागवड केल्यानंतर वेळेवर पाऊस पडेलच असे नाही. ब-याच वेळेला लागवडी नंतर कित्येक दिवस पाऊस पडत नाही. त्यामुळे शेतीत पेरलेले बियाणे वाया जाते. शेतक-यांना दुबार पेरणी करावी लागते. व आर्थिक भुर्दडाला सामोरे जावे लागते. पावसाच्या या लहरीपणामुळे शेती क्षेत्रात बाराही महिने पिके घेणे शक्य होत नाही. कारण भारतात जून ते सप्टेंबर या चार महिन्यांचा कालावधी पावसाळयाचा मानला जातो. यातही अनियमितता असते त्यामुळे कृत्रिम पध्दतीने जलसिंचनाची सुविधा नसलेल्या ठिकाणी व्यापारी पिके व नगदी पिकांचे उत्पादन घेता येत नाही व या सर्वांचा कृषी उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होतो.

२) **जल सिंचनाच्या अपु-या सोयी :** जलसिंचनाच्या अपु-या सोयीमुळे देखील शेतीची उत्पादकता कमी होते. कारण, भारतीय शेती ही मान्सुनवर अवलंबून आहे. भारतात एकूण जमिनीपैकी फक्त २८ टक्के जमिनीस पाणीपुरवठा होतो. जोपर्यंत जलसिंचनाच्या सोयी पूर्णपणे निर्माण केल्या जात नाहीत तोपर्यंत खते, सुधारीत बी-बियाणे इत्यादींचा चांगल्या प्रकारे वापर करता येत नाही. जलसिंचनाच्या सोयी नसतांना या घटकांचा वापर करणे म्हणजे शेती वाळविणे होय. त्यामुळे जलसिंचनाच्या अपु-या सोयींमुळे शेतीची उत्पादकता कमी आहे.

३) **अशिक्षित शेतकरी वर्ग :** भारतीय शेतकरी अशिक्षित असल्यामुळे देखील शेतीची उत्पादकता कमी होते. भारतीय शेतकरी निरक्षर, अज्ञानी, अंधश्रध्देवर विश्वास ठेवणारा, रुढी व परंपरावादी असल्यामुळे शेतकरी जुनाट पध्दतीने शेती करतो. तसेच तो निरक्षर असल्यामुळे त्याला आधुनिक बी-बियाणांचा वापर करता येत नाही. रासायनिक खताचा वापर करता येत नाही. आधुनिक तंत्राचादेखील त्याला वापर करता येत नाही. त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी होते.

४) **धारण क्षेत्राचा आकार :** भारतात ८९ टक्के शेतक-यांजवळ एकूण शेती क्षेत्राच्या ३०टक्के जमीन आहे. याचा अर्थ असा की, प्रत्येक शेतकरी साधारणत २ हेक्टर शेतीचा मालक आहे त्यामुळे शेतीचे विभाजन अनेक तुकड्यांमध्ये होते. या शेतीचे तुकडे केल्यामुळे भारतीय शेतीचे धारणक्षेत्र इतके लहान आहे की, आर्थिक दृष्टिने ते किफायतशीर ठरत नाही जमिनीच्या तुकडीकरणामुळे शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान व यंत्रांचा वापर करु शकत नाहीत व त्यामुळे कृषीक्षेत्रातील उत्पादन कमी राहते.

५) **जमीन कसण्याची पध्दत :** भारतीय कृषीक्षेत्रात प्रामुख्याने पारंपारिक पध्दतीने शेती करण्यावर भर असलेला दिसून येतो. जुनाट, कालबाह्य तंत्राच्या वापरामुळे कृषी उत्पादन कमी होते. भारतीय कृषीक्षेत्रावर जमीनदारी पध्दतीचे बरीच वर्ष प्राबल्य होते. यामध्ये प्रत्यक्षात जमिनीचे मालक वेगळे व शेत जमिनीत काम करणारे कूळ वेगळे अशी परिस्थिती होती. जमीनदार वर्ग कुळांकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक खंड वसूल करत असायचा. त्यामुळे कुळाची परिस्थिती अधिक हलाखीची तर जमीनदार वर्ग अधिक श्रीमंत झाल्याचे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतात विविध प्रकारचे मध्यस्तांच्या उच्चटनाचे कायदे केले गेले; परंतु त्यातूनही वेळोवेळी पळवाटा निघत गेल्या याचा परिणाम कृषी क्षेत्रावर झाला.

६) **शेती संशोधनाकडे दुर्लक्ष :** भारतीय शेतीमध्ये संशोधनाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे भारतीय शेतीला पोषक अशी आधुनिक बी-बियाण्यांचा वापर करता येत नाहीत. त्या शेतीत ठिबक सिंचनाचा उपयोग होत नाही. तसेच औषधी साधनांचाही उपयोग होत नाही. कोरडवाहू जमिनीमध्ये अधिक उत्पादन घेता यावीत अशा बी-बियाणांच संशोधन होणे आवश्यक आहे. परंतू ते होत नाही. अशाप्रकारच्या संशोधनाकडे दुर्लक्ष केल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी राहते.

७) **शेती व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या सेवांचा अभाव :** शेती व्यवसायासाठी आवश्यक असणा-या विविध त-हेच्या सेवा भारतात अभावानेच आढळतात किंवा त्यांचा पुरवठा अत्यंत अपुरा व अनियमित असतो. शेतमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक तेवढा व योग्य वेळी कर्ज पुरवठा केला जाणे आवश्यक आहे; पण अद्याप बहुसंख्य शेतक-यांना कर्जासाठी सावकारांकडे जावे लागते. सावकार मोठ्या दराने व्याज आकारतो व इतर अनेक त-हेने शेतक-यांची पिळवणूक करतो, त्यामुळे त्याचा शेती उतपादकतेवर अनिष्ट परिणाम होतो. त्याचप्रमाणे पशुवैद्यकीय सेवा, खरेदी विक्रीच्या सेवा, साठवणूकीच्या सुविधा, रासायनिक खते, शास्त्रीय पध्दतीने वापरण्यासंबंधी शिक्षण देणा-या सेवा इत्यादिचा बहुसंख्य शेतक-यांच्या बाबतीत अभवा किंवा अपुरा व अनियमित पुरवठा इत्यादी कारणामुळे शेती क्षेत्रातील उत्पादकतेवर अनिष्ठ परिणाम घडून येतो व त्याकारणाने भारतातील शेती उत्पादकता सापेक्षतेने व निरपेक्षतेनेही अल्प राहते.

### शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे

१) **कर्जबाजारीपणा :** वाढता कर्जबाजारीपणा हे आत्महत्येचे प्रमुख कारण आहे. शेती क्षेत्राला सवलतीच्या दराने होणारा वित्तपुरवठा

अद्यापही अपुरा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीयकृत बँका व वित्तीय संस्थांनी शेतकऱ्यांना सुलभ कर्ज पुरवठा करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अजुनही दूरवर पसरलेल्या सर्व खेडयांतील शेतकऱ्यांपर्यंत हा कर्ज पुरवठा पोहोचलेला नाही. यामुळे शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडून कर्जे घेण्याचा मार्ग पत्करावा लागतो. अवाजवी व्याज दरामुळे अशी कर्जे घेणे शेतकऱ्यांना परवडत नाही तो कर्जाच्या सापळयात अडकून पडतो. सहकारी पतपुरवठा संस्था व इतर बँकाकडून कर्जे मिळाली तरी शेतकऱ्याने ती कर्जाची रक्कम गुंतविल्यानंतरही उत्पान्नाची हमी नसते. अनियमित पाउस, हवामानातील बदल, कीड व किटकांचा प्रादूर्भाव इत्यादी कारणामुळे पिके हाती येतीलच असे नाही. अशा स्थितीत कर्जाचे हप्ते वेळेवर भरता येत नाहीत. मुद्दल व व्याज यांच्या रक्कमा थकीत होतात. हप्ते वेळेवर न भरल्याने बऱ्याचदा शेतकऱ्यांना व्याजावर व्याज द्यावे लागते. यातून त्यांचा कर्जबाजारीपणा वाढतो. अशा सततच्या कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करतात.

२) **व्यवसाय शिक्षणाचा अभाव :** भारतातील व महाराष्ट्रातील शेतकरी हा परंपरागत पध्दतीने शेती करतो. बहुतांश शेतकरी हे कमी शिक्षण घेतलेले आहेत. जे थोडे शिकलेले आहेत ते ही शेतीचे व्यवस्थापन यापासून दूरच राहिलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चात जास्त उत्पन्न होण्याच्या पध्दती शिक्षण मिळालेले नसते. परिणामी शेतकरी तोटयात जातो.

३) **शासनाचे धोरण :** शासनाची धोरणे ही शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत करणारी नसतात. शासनाची धोरणे ही फक्त कागदावरच असतात ते प्रत्यक्ष समस्या सोडवण्यात लक्ष घालतात असे नाही. धोरणे राबवली तरी ती वेळ गेल्यानंतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतात. उदा. अर्थपुरवठा, वीज रोगांचा प्रादूर्भाव पडल्यास पीक गेल्यानंतर उपाययोजना येतात.

४) **अनिश्चित शेतमालाच्या किंमती :** शेतमालाला मिळणारा अल्प भाव यामुळेही शेतकरी वर्ग अडचणीत सापडतो. गोदामाच्या पुरेशा सोयी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्याला माल विक्री करण्याची घाई करावी लागते. अर्थात मिळेल त्या दराने शेतमालाची विक्री केली जात असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते. बाजारात शेतमालाचा भाव कधी वधारतो तर कधी घसरतो. शेतमालाचा भाव जेव्हा वाढतो तेव्हा त्याचा फायदा प्रामुख्याने बाजारातील व्यापाऱ्यांना व दलालांना होतो. शेतकरी वर्ग अशा लाभांपासून वंचित राहतो. शेतमालाचे भाव जेव्हा घसरतात तेव्हा त्याचा फटका मात्र शेतकऱ्यांना बसतो. शेतमालाच्या किंमतीच्या चढउतारामुळे शेवटी शेतकऱ्यांचे नुकसान होत असते.

५) **अनियमित पर्जन्यमान :** शेतीसाठी कायमस्वरूपाच्या पाण्याची गरज असते. पण भारतातील सद्यपरिस्थिती कायम स्वरूपी पाणी उपलब्ध नाही. परिणामी पाण्याअभावी शेती उत्पादन वाढत नाही. अपुऱ्या सिंचन सुविधा हे ही शेतकऱ्यांना आत्महत्येस जबाबदार आहे. महाराष्ट्रातील सरासरी सिंचन ११ टक्के इतके आहे. शेतीसाठी उपलब्ध असलेले पाणीही शेतकरी विजेअभावी विकास देऊ शकत नाही ही समस्या सर्वात जास्त महत्वाची वाटते.

७) **सामाजिक प्रथांचा प्रभाव :** शेतकरी वर्गावर रूढी, परंपरा व प्रथांचा प्रभाव आहे. रूढी व परंपरेचे पालन करण्यासाठी तो अडचणीत असूनही पैसे खर्च करतो धार्मिक विधी, घरगुती समारंभ वा इतर प्रथांचे पालन करण्यासाठी प्रसंगी तो कर्ज ही काढतो. काही वेळा शेतीसाठी काढलेली कर्जे अशा अनुत्पादक बाबींवर तो खर्च करतो. यामुळे कर्जाच्या परतफेडीच्या वेळी अडचणी निर्माण होतात. शेतकऱ्यांवरील कर्जाचा डोंगर वाढत जाउन त्यांच्यात आत्महत्येची मानसिकता निर्माण होते.

८) **शेतीचे तुकडीकरण :** लोकसंख्या वाढीमुळे जमीनीचे अनेक लहान लहान भागात विभागणी झालेली आहे. परिणामी ते या लहान लहान शेती करण्यास व शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास फारसे फायदेशीर ठरत नाही. परिणामी उत्पन्न स्थिर राहते.

९) **कृषी धोरणाचा अभाव :** भारतात कृषी क्षेत्रात सर्व समावोक धोरणाचा आभाव आहे. पीक नियोजन करणे, कृषी उत्पादने, योग्य तंत्रज्ञान, भांडवलाचा पुरवठा, बाजारपेठ, शेतमालाच्या वस्तूंची निर्यात इत्यादीची व्यवस्था मजबूत करणारे सर्व समावेष कृषी धोरण आखून त्याची प्रभावीपणे कार्यवाही करणे नितांत गरजेचे आहे. याशिवाय भाववाढीमुळे शेतक-यांची आर्थिक स्थिती वाईट बनते. कौटुंबिक कलह व संघर्ष, मुला-मुलींच्या लग्नाचा वाढता खर्च, आरोग्य विषयक समस्या व व्यसनाधीनता इत्यादी कारणे ही शेतक-यांच्या आत्महत्येस जबाबदार आहेत.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाययोजना

१. शेतक-यांच्या आत्महत्या राष्ट्रीय आपत्ती आहे. हे शासनाचे घोषीत करून उपाययोजन आखाव्यात.
२. शासनामार्फत मिळणाऱ्या सबसिडीत वाढ करण्यात यावी.
३. स्मार्ट शेतीची संकल्पना शेतकऱ्यांनी शेतीत राबवावी.
४. सिंचनाच्या विविध साधनांचा वापर शेतीत वाढवावा.
५. जलयुक्त शिवाराची व्याप्ती वाढवावी.
६. पुनर्भरण मोहीम राबविण्यासाठी शासन आणि प्रशासन कठोर भूमिका घ्यावी.
७. शेती पुरक व्यवसायाचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना द्यावे.
८. शासनाकडून शेतक-यांना "“जीवन विमा” आणि “पिक विमा योजना” लागू करावा.
९. “गाव तिथं परिक्षण केंद्र” उभे करावेत.
१०. बहुराष्ट्रीय कंपन्यांवर निर्बंध आणावेत.
११. जोड व्यवसाय आणि लघुउद्योग करावेत.
१२. शेती उत्पन्न आणि खर्चाचे नियोजन करावे.
१३. अन्नधान्य वितरण व्यवस्था अधिक सक्षम व पारदर्शक करावी.
१४. उत्पादकता वाढविण्यासाठी अंतरपिकांची माहीती शेतक-यांना देण्यात यावी.
१५. शेतमालाल योग्य भाव मिळावा यासाठी शासनाने कायम शेतकरी हित लक्षात ठेऊन मालाला योग्य भाव मिळेल यासाठी प्रयत्नशील असणे.
१६. बिगरशेती क्षेत्रातील रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजे.
१७. सेवाभावी संस्था व ट्रस्ट यांनी शेती विकासासाठी गावे दत्तक घ्यावीत.
१८. ग्रामीण भागात रोजगार, सेवा, उद्योग आणि

नोक-यांचे विकेंद्रिकीकरण होणे आवश्यक आहे.

१९. योग्य वेळी कृत्रिम पावसाचे प्रयोग करावेत.

२०. अडते / मध्यस्थ / दलाल मुक्त बाजारपेठ निर्माण करणे.

२१. शेतीसाठी विशेष 'आर्थिक क्षेत्र' तयार करावे.

२२. शेतीला व्यवसायाचा दर्जा देण्यात यावा.

**संदर्भ सूची**


१. सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र , प्रा. डॉ .प्रदीप आगलावे, २०१५, श्री साईनाथ प्रकाशन ,नागपूर .४४००१०.

२. सामाजिक संशोधन पद्धती ,प्रा. डॉ. सुनील माई,२०१८, डायमंड पब्लिकेशन,पुणे.

३. कै. डॉ.स.श्री मुदेसाई डॉ.सौ. निर्मल भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था,मे. २०११,निराली प्रकाशन,पुणे.

४. डॉ.टी.व्ही. पोवळे, डॉ. एस.आर. टकले, डॉ.विलास खंदारे, कृषी विकासाचे अर्थशास्त्र, जुलै २०१२, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

५. डॉ.दत्तात्रय भुतेकर, कृषी अर्थशास्त्र,सप्टेंबर २०१५,औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

६. डॉ. विजय कविमंडन, कृषी अर्थशास्त्र, २००२, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

७. सामाजिक संशोधन पद्धती ,प्रा. डॉ. सुनील माई,२०१८, डायमंड पब्लिकेशन,पुणे.

८. Shodhganaga.inflibnet.ac.in

९. www.jagranjosh.com

१०. www.naxmaharashtra.com


***


**- प्रा.प्रियंका राजेंद्र आठे**

(समाजशास्त्र विभाग)

डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालया, जळगाव- ४२५००१

Email : athepriyanka@gmail.com

मो. ७५१७९१०५५९